आपण आपलेच फक्त पाहावे म्हटले
तर ते आम्हाला जगू देत नाहीत;
आम्ही त्यांचेच बघायचे ठरवले
तर आपले आम्हाला ठेवत नाहीत.

लोक म्हणतच असतात, नेहमी
आपले-तुपले समतोल हवा
असेच करत बसलो तर
जगण्यात दम येईल नवा?

१४.१.२०१९